महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १०४ वा दिनांक : १८/०१/२०२५ वार : शनिवार

## गडकरी म्हणाले- खराब रस्ते बनवणे हा अजामीनपात्र गुन्हा असावा



चुकीचा रस्ता बांधणे हा अजामीनपात्र गुन्हा ठरवला पाहिजे, असे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी सांगितले. रस्ते अपघातासाठी रस्ते कंत्राटदार आणि अभियंत्यांना जबाबदार धरून त्यांना तुरुंगात पाठवावे. सीआयआय या उद्योग संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात गडकरी म्हणाले की, रस्ते अपघातात भारत जगात पहिल्या क्रमांकावर आहे. २०३० पर्यंत रस्ते अपघातात मृत्यूमुखी पडणाऱ्या लोकांची संख्या निम्मी करण्याचे आमचे लक्ष्य आहे.

गडकरी म्हणाले की, मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २०२३ मध्ये पाच लाख रस्ते अपघात झाले. ज्यामध्ये १.७२ लाख मृत्यू झाले. त्यापैकी ६६.४% म्हणजेच १.१४ लाख लोक १८ ते ४५ वयोगटातील होते, तर १० हजार लोक मुले होती. ५५ हजार मृत्यू हेल्मेट न घातल्याने तर ३० हजार मृत्यू सीट बेल्ट न लावल्यामुळे झाले आहेत.

महामार्गावरील ब्लॅक स्पॉट्स हटवण्यासाठी महामार्ग मंत्रालय ४० हजार कोटी रुपये खर्च करत असल्याचेही गडकरी म्हणाले. त्यांनी उद्योग आणि इतर भागधारकांना ड्रायव्हर प्रशिक्षण आणि फिटनेस केंद्रे तयार करण्यासाठी सरकारसोबत काम करण्याचे आवाहन केले. जेणेकरून देशातील ड्रायव्हर्सची कमतरता दूर करता येईल.

गेल्या ५ वर्षात देशात रस्ते अपघातात ७.७७ लाख मृत्यू झाले आहेत. उत्तर प्रदेशात सर्वाधिक १.०८ लाख मृत्यू झाले आहेत. यानंतर तामिळनाडू ८४ हजार मृत्यूंसह दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर असून महाराष्ट्र ६६ हजार मृत्यूंसह आहे.

विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी जाहीर केलेल्या २०१८ ते २०२२ पर्यंतच्या आकडेवारीच्या आधारे, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने 'भारतातील रस्ते अपघात, २०२२' अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार २०२१ मध्ये देशात रस्ते अपघातात १,५३,९७२ मृत्यू झाले होते, जे २०२२ मध्ये वाढून १,६८,४९१ झाले.

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी १२ डिसेंबर रोजी सांगितले होते की, जगातील रस्ते अपघातांबाबत आमच्याकडे सर्वात वाईट रेकॉर्ड आहे. जेव्हा मी आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्यासाठी जातो आणि तेथे रस्ते अपघातांबद्दल चर्चा होते तेव्हा मी माझा चेहरा लपवण्याचा प्रयत्न करतो.

प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान प्रश्नाला उत्तर देताना नितीन गडकरी म्हणाले की, भारतातील परिस्थिती बदलेल जेव्हा मानवी वर्तन आणि समाजात बदल होईल आणि कायद्याचा आदर होईल. त्यांचा वैयक्तिक अनुभव सांगताना त्यांनी सांगितले की, काही वर्षांपूर्वी त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबाचा एक मोठा रस्ता अपघात झाला, ज्यामध्ये त्यांना बराच काळ रुग्णालयात राहावे लागले. ते म्हणाले, 'देवाच्या कृपेने मी आणि माझे कुटुंब वाचलो. मला अपघातांचा वैयक्तिक अनुभव आहे.

गडकरी म्हणाले की, रस्त्यावर ट्रकचे पार्किंग हे अपघातांचे प्रमुख कारण आहे आणि अनेक ट्रक लेनची शिस्त पाळत नाहीत. गडकरी म्हणाले की, भारतात बस बॉडी तयार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानकांचा अवलंब करण्याचे आदेश दिले आहेत. बसच्या खिडकीजवळ हातोडा असावा, जेणेकरून अपघात झाल्यास खिडकी सहज तोडता येईल, असे त्यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस २० ते २४ जानेवारी दावोसमध्ये



**मुंबई :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे येत्या २० ते २४ जानेवारी या काळात दावोसमध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये सहभागी होणार आहेत. यासाठी १९ तारखेला पहाटे ते मुंबईतून रवाना होणार आहेत. सर्वाधिक परकीय गुंतवणूक आकर्षित करणारा आणि आकांक्षांनी परिपूर्ण महाराष्ट्रात आणखी गुंतवणूक आणण्याच्या हेतूने त्यांचा हा दौरा अत्यंत महत्त्वपूर्ण असणार आहे.

यापूर्वी देवेंद्र फडणवीस हे त्यांच्या पहिल्या कार्यकाळात ३ वेळा दावोसमध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये सहभागी झाले होते. औद्योगिक विकासात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरुन पहिल्या क्रमांकावर आला होता. राज्यात त्या काळात मॅग्नेटिक महाराष्ट्राचे दोन वेळा आयोजन झाले. आताही या दौऱ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भरगच्च कार्यक्रम दावोस दौऱ्यात राहणार आहेत. अनेक जागतिक नेत्यांच्याही ते भेटी घेणार आहेत. या दौऱ्यात उद्योगमंत्री उदय सामंत, तसेच एमआयडीसी, एमएमआरडीए, सिडको अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ त्यांच्यासोबत असेल.

डेटा सेंटर्स, ऑटोमोबाईल्स, सेमिकंडक्टर, ईव्ही, इलेक्ट्रॉनिक्स, स्टील, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधी आणि पायाभूत सुविधा इत्यादी क्षेत्रात मोठ्या संख्येने सामंजस्य करार या दौऱ्यात होणार आहेत. महाराष्ट्राच्या १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक राज्यात आणण्याचा प्रयत्न या दौऱ्यातून साध्य करण्याचा प्रयत्न होईल. यातून रोजगारनिर्मितीचेही उद्दिष्ट साध्य केले जाणार आहे.

राज्यात गुंतवणूक आणताना किंवा पायाभूत सुविधांचा विकास करताना आम्ही सातत्याने चौफेर विकास कसा होईल आणि प्रादेशिक समतोल कसा राखला जाईल, यावर भर दिला. या दावोस दौऱ्यात सुद्धा महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रात आणि सर्व विभागात गुंतवणूक कशी येईल, यादृष्टीने आमचे प्रयत्न असतील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

## सैफ अली खानवरील हल्ल्यामागे चोरी एकमेव हेतू - योगेश कदम





**पुणे :** बॉलिवूड स्टार सैफ अली खानवर झालेल्या हल्ल्याच्या घटनेने संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. या हल्ल्यामागील कारणाबाबत वेगवेगळे अंदाज बांधले जात आहेत. सैफ अली खानवर त्याच्या मुंबईतील अपार्टमेंटमध्ये झालेल्या हल्ल्यामागे केवळ चोरीचा हेतू होता, अशी माहिती राज्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी शुक्रवारी दिली. या हल्ल्यामागे कोणत्याही अंडरवर्ल्ड टोळीचा हात नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सैफ अली खानच्या वांद्रे येथील १२ व्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये एका व्यक्तीने चाकूने हल्ला केला होता. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. त्याच्यावर मानेसह अनेक ठिकाणी वार करण्यात आले होते, त्यानंतर मुंबईच्या लीलावती रुग्णालयात त्याच्यावर तत्काळ शस्त्रक्रिया करण्यात आली. योगेश कदम यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत बोलताना सैफ अली खानवरील हल्ल्यावर प्रतिक्रिया देत माहिती दिली.

गृह राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, या हल्ला प्रकरणी मुंबई पोलिसांनी एका व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. ज्याचा चेहरा संशयित हल्लेखोराशी जुळतो. तो इमारतीतून पळून जात असताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. त्या व्यक्तीचा गुन्हेगारी रेकॉर्ड असून पोलिस त्याची चौकशी करत आहेत.

या हल्ल्यात कोणत्याही गुन्हेगारी टोळीचा सहभाग असल्याबद्दल विचारले असता, प्राथमिक तपासात असा कोणताही अँगल असण्याची शक्यता नाकारली गेली आहे. या घटनेमागे आतापर्यंत चोरीचाच हेतू होता. सैफ अली खान यांना धमकी आली असल्याचा उल्लेख केला नाही. कधी धमकी आली नाही, विरोधी पक्षाने वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला आहे. सैफ अली खान यांनी मागणी केली, तर सुरक्षा देण्यासाठी विचार केला जाईल, असेही योगेश कदम यांनी सांगितले. शाहरुख खान याच्या घराच्या रेकीबद्दल बोलताना योगेश कदम हे म्हणाले की, शाहरुख खान याच्या घराची रेकी केली गेली, अशी कोणतीही माहिती ही प्रशासनाकडे नाही.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ जानेवारी २०२५


## कटी पतंग, वन जागरातून डॉ. संतोष पाटील यांनी सोळा पक्षांचे वाचविले प्राण







**कन्नड (अरुण थोरात):** देशभर जानेवारी महिन्यात भारतीय आकाश पतंगांनी भरलेलं असते. बऱ्याच शाळा, संस्था, मंडळ, पतंग महोत्सव आयोजित करतात. मुळात पतंग ही फटाक्याप्रमाणे चीनची परंपरा आहे. चीन मध्ये त्यास "झेन" म्हणतात. पतंग ही भारतीय संस्कृती नाही. त्यामुळे त्याचे उदात्तीकरण नको असे आवाहन आज देशभरातील पर्यावरण प्रेमी करत आहेत. पतंगाच्या मांज्यात अडकून देशात लाखो पक्षी जखमी होतात, मरतात. अनेक माणसांचा गळा चिरुन बळी गेला आहे. जखमी होण्याच्या हजारो घटना रोज घडतं आहेत. छतावरून पडून अनेक मुलं मृत्युमुखी पडलेत. भारतात चायनीज म्हणजेच नायलॉन मांजा विकणे प्रतिबंधित आहे. तरी ही सर्रास विकला जातो. काचेचा मांजा, धातूचा चुरा लावलेला मांजा ही बाजारात उपलब्ध आहे. मेटल कोटेड मांजाचा विद्युत तारांना स्पर्श होऊन अनेक लहान मुलांचा बळी ही गेला आहे. याबाबत अभिनव प्रतिष्ठानचे वन्यजीव व वृक्ष संवर्धक डॉ. संतोष पाटील हे पक्षी वैभव टिकून रहावे म्हणून दरवर्षी विविध शाळांमध्ये जाऊन वनजागर या प्रबोधक उपक्रमातुन १० दिवसांपासुन जनजागृती करत आहेत. सिल्लोड शहरातील शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रबोधन करून मुलांनी पतंग न उडवण्याची शपथ घेतली. अनेक विद्यार्थी पतंगबाजी करत नाही. याबाबतची फ्रेमही शाळेस भेट दिली. पालोदवाडी, बहुली, सह अनेक शाळांनी हा उपक्रम राबविला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजीव टी.दौड, गणेश चव्हाण, श्री सोनवणे, श्री फरकाडे, श्रीमती काळे आदी सर्व शिक्षकांची उपस्थिती होती.दरवर्षी प्रमाणे यावेळी ही डॉ. पाटील यांनी पतंगाच्या दोऱ्याने जायबंदी झालेले १६ पक्षी वाचविले आहेत.

कोणताही दोरा हा पक्षांना घातक असतो. पक्षी गतिमान असतात त्यामुळे साधा दोरा ही त्यांच्या साठी जीवघेणा ठरतो. जखमी पक्षी जमिनीवर पडला की कुत्रे, मांजर त्याला ठार करतात. पतंग उडवण्याची वेळ एकतर सकाळी असते व संध्याकाळी असते. सकाळी पक्षी अन्नाच्या शोधात बाहेर पडत असतात तर संध्याकाळी ते घराकडे परतत असतात. याच वेळेस पक्षी पतंगात अधिक अडकतात. प्लास्टिक पतंग पर्यावरणाची हानीकारक असतो. सध्या प्लास्टिकचे पतंग उडवण्याचा ट्रेंड आलाय. प्लास्टिक हे कधी ही नष्ट होत नाही. पृथ्वीवर आधीच खुप मोठा प्लास्टिक कचरा आहे त्यात ही पतंगाची भर पडत आहे. त्यामुळे सर्वांनी प्लास्टिक मुक्ती संकल्प करुण आपली निसर्ग संपदा वाचवावी.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002


## तिरुपती बालाजी येथे भोई समाज अधिवेशनाचे आयोजन

**कन्नड (अरुण थोरात) :** अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थे च्या वतीनेतिरुपती बालाजी येथे अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. एस.आर. कन्व्हेशन हॉल मध्ये दि. १८ व १९ जानेवारी अशा दोन दिवसाचे भोई समाज अधिवेशन होणार असल्याची माहिती अखिल भारतीय भोई समाज राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.एकनाथ काटकर, राष्ट्रीय महासचिव गजानन दादा साटोटे, राष्ट्रीय समन्वयक नानासाहेब लखारे, प्रदेशाध्यक्ष तुकाराम वानखेडे यांनी दिली. या अधिवेशन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी, व आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांना निमंत्रित केले आहे. या अधिवेशनाला देशभरातील भोई समाज उपस्थित राहणार आहेत.

देशभरात लाखांच्या संख्येत असलेल्या समाजाच्या विकासासाठी राजकीय अस्तित्व नसल्यामूळे समाजाचा विकास ही खुंटला आहे.सामाजिक प्रश्नांची मांडामांड करुन त्यावरील उपाययोजना सुचवत भोई समाजाच्या प्रतिनिधीची विधान परिषदेवर निवड करण्याची मागणी या अधिवेशनात करण्यात येणार आहे. संपादक शामराव आळणे, ॲड. दादाराव आळणे, ॲड. शंकर वानखेडे, चंद्रकांत लाडे, लक्ष्मण वाल्डे, जोगेश्वर लाडे, आनंद मोरे, विजय श्रीनाथे, शिवाजी मोरे, अशोक वायडे, किशोर बनसोडे, पंकज बावणे सह समस्त कन्नड तथा अखिल भारतीय भोई समाजबांधवांनी या अधिवेशनाला प्रतिसाद देत भरभरून शुभेच्छा दिल्या.

## किशोर जऱ्हाड यांच्या 'पेरण' या कवितासंग्रहाला धोंडीराम माने लेखन पुरस्कार जाहीर



**अमरावती :** दि. १० फेब्रु. २०२५ रोजी राज्यस्तरीय १४ वे गुणीजन साहित्य संमेलन, छत्रपती संभाजीनगर येथे मान्यवर साहित्यिक प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील (अध्यक्ष, म. सा. प.), मा. डॉ. दासू वैद्य (जेष्ठ कवी, चित्रपट गीतकार ) यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख ५००० रु. स्मृतिचिन्ह , शाल, बुके. असे डॉ. सुभाष माने अध्यक्ष, कै धोंडीराम माने विकास प्रबोधनी, छत्रपती संभाजीनगर यांनी जाहीर केले.

हा पुरस्कार वितरण सोहळा छत्रपती संभाजीनगर येथील रेल्वे स्टेशन रस्त्यावरील भानुदासराव चव्हाण सभागृहात होणार आहे

## जीआयएस शिकण्याने विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात संधी



**औसा :-** येथील आझाद महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने `भूगोल दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. के.बी. शिंदे यांनी, जीआयएस {भौगोलिक माहिती प्रणाली} शिक्षणाने विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात व्यवसायाच्या संधी मिळतात, त्यासाठी विद्यार्थ्यांनी हे शिक्षण मिळविणे आवश्यक असल्याचे मत प्रतिपादित केले. अध्यक्षस्थानावरून बोलतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ई. यू. मासुमदार यांनी भूगोल विषयाचे महत्व, उत्तरायण, दक्षिणायन, पृथ्वी आणि इतर ग्रहाचे परिभ्रमण इ. माहिती सांगितली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या भूगोल विषय माहितीवजा भित्तिपत्रकाचे उद्घाटनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. दिलीप भोगे यांनी महाविद्यालयातील भूगोल विभागाची सविस्तर माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा. पटेल खैरात यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भूगोल विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. पांडूरंग आचोले यांची विशेष भूमिका होती. त्यांनी विभागांतर्गत विद्यार्थ्यांसाठी राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देऊन त्याचा विद्यार्थ्यांनी उपयोग करून घेण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास प्रा. श्रीराम जाधव, प्रा.खुशनूद मॅडम व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. शेवटी प्रा. वैजिनाथ जावळे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.कार्यक्रमाचे वार्तांकन प्रा. डॉ. दुष्यंत शिंदे यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ जानेवारी २०२५


## देवेंद्र फडणवीस म्हणाले - सैफवरील हल्ल्याचे बरेच धागेदोरे पोलिसांकडे

**नागपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस २० ते २४ जानेवारी दरम्यान दावोस दौऱ्यावर आहेत. या कालावधीत ते वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये सहभागी होणार आहेत. दावोसमध्ये मला चांगल्या प्रकरच्या गुंतवणुकीच्या संधी दिसत आहेत. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते आज नागपूर येथे माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी बीड आणि सैफ अली खान प्रकरणावरही आपली प्रतिक्रिया दिली.

विचारांचे आदान-प्रदान आणि मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीचे देखील नेटवर्किंग होते. त्या दृष्टीनेच मी दावोसला जात आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच राजकारण कुठेतरी थांबले पाहिजे. ही केस घेण्यासंदर्भात उज्वल निकम यांच्याशी चर्चा केली असून ते याबाबत सकारात्मक निर्णय घेतील, असा विश्वासही देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

बीड प्रकरणात होणारे राजकारण कुठेतरी थांबले पाहिजे. तपास यंत्रणा सगळ्या गोष्टी रोज बाहेर सांगू शकत नाहीत. अनेक गोष्टी गोपनीय ठेवूनच तपास केला जातो. त्यामुळे तपास यंत्रणांवर कुठल्याही प्रकारचा दबाव न आणता, त्यांना काम करू दिले पाहिजे. बीड प्रकरणातील कोणत्याही दोषी व्यक्तीला कुठल्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. तपास यंत्रणा योग्य प्रकारे काम करत आहेत.

उज्वल निकम यांच्यासारख्या एका वकिलाची नियुक्ती करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. यासंदर्भात उज्वल निकम यांना विनंती देखील केलेली आहे. ते सकारात्मक निर्णय घेतील, असा मला विश्वास आहे. परंतु, मला नेमल्यानंतर काही लोक राजकारण करतात, राजकीय रंग देतात. हे मला योग्य वाटत नाही, असे उज्वल निकम यांनी मला सांगितल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले. देशामध्ये अनेक वकील आहेत. उज्वल निकम यांच्या नियुक्तीवर राजकारण करणे, याचा अर्थ गुन्हेगारांना कुठेतरी मदत करण्यासारखे आहे. त्यांनी केस घेतली की, खऱ्या गुन्हेगारांना शिक्षा होतेच, असा उज्वल निकमांचा आजपर्यंतचा इतिहास आहे. कुणाला वाचवाचये असेल, तर उज्वल निकम यांच्या नियुक्तीला विरोध होईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

दावोदमध्ये जगभरातील बिझनेस आणि पॉलिटीकल लीडर्स एकत्र येतात. त्याठिकाणी विचारांचे आदान-प्रदान आणि मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीचे देखील नेटवर्किंग होते. त्या दृष्टीनेच मी दावोसला जात आहे. बिझनेस लीडर्स आणि जागतिक नेत्यांसोबत माझ्या अनेक महत्वाच्या बैठकी ठरलेल्या आहेत. दावोसमध्ये मला चांगल्या प्रकारच्या गुंतवणुकीच्या संधी दिसत आहेत. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणण्यासाठी आम्ही यशस्वी होऊ, असा विश्वासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

## युवकांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेतून देश प्रेम व देशभक्ती वाढीस लागते - प्रा. डॉ. सदावर्ते

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांना स्वावलंबी शिक्षणाचे धडे मिळतात विद्यार्थी स्वतःचे काम स्वतः करायला शिकतात, विद्यार्थ्यांमध्ये देश प्रेम व देशभक्ती वाढीस लागते, असे प्रतिपादन जे ई एस महाविद्यालय जालना च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मौजे- सायगाव (डोंगरगाव ) ता. बदनापुर,जि- जालना येथे सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिरा च्या उद्घाटन प्रसंगी च्या कार्यक्रमात,उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते यांनी केले.जेईएस महाविद्यालय जालना च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मौजे- सायगाव (डोंगरगाव) ता.बदनापुर जि. जालना ,येथे सात दिवशीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दि. १६ते २२ जानेवारी २०२५ दरम्यान केलेले आहे. शिबिराचे उद्घाटन कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राध्यापक डॉक्टर महावीर सदावर्ते होते तर कार्यक्रमाचे अध्यक्षपदी आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री पंढरीनाथ उनवणे होते व्यासपीठावर सायगाव चे सरपंच श्रीमती मुक्ता शत्रुघ्न बरांडे तसेच डोंगरगावच्या सरपंच श्रीमती चंद्रकला नारायण रिठे या होत्या, उपसरपंच उद्धव घनगाव, ग्रामसेवक श्री जगताप तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे जालना जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.राजेंद्र सोनवणे, प्रा.डॉ. सुनील इंदुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी केले असून, 'नॉट मी बट यु 'माझ्यासाठी नव्हे केवळ तुमच्यासाठी', या भूमिकेतून राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी श्रमदान करावे श्रमदानातून स्वावलंबी शिक्षण मिळते, त्यामधून चांगले प्रशासक अधिकारी आदर्श नागरिक तयार होतात, असेही डॉ. सोनवणे यांनी सांगितले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना जेईएस महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. महावीर सदावर्ते म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजने मधून विद्यार्थ्यांना स्वावलंबी शिक्षणाचे धडे मिळतात, विद्यार्थी स्वतःचे काम स्वतः करायला शिकतात. विद्यार्थ्यांमध्ये देश प्रेम व देशभक्तीचे भावना निर्माण होते, हेच विद्यार्थी पुढे आत्मनिर्भर भारत घडवण्यासाठी कार्य करत असतात असेही डॉक्टर सदावर्ते यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना आदर्श विद्यालयचे मुख्याध्यापक श्री पंढरीनाथ उनवणे मला आहे की, युवकांनी महाविद्यालयीन जीवनामध्ये समाजासाठी कार्य करावे आपण या समाजाचे देणे लागतो या भावनेतून कार्य केल्यास निश्चित देशांमध्ये सामजस्याची भावना निर्माण होऊन राष्ट्रीय एकता अखंडता वाढण्यास मदत होईल असेही श्री. उनवणे यांनी सांगितले.

यावेळी दुधना शिक्षण संस्थेचे सदस्य श्री. शिंदे, श्री नारायण रिठे, श्री शत्रुघन बरांडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राजेश सरकटे, तसेच आदर्श विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सायगाव व डोंगरगाव येथील ग्रामस्थ व शिबिरार्थी स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगेश लहामटे यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. किशोर तापडिया यांनी व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. भरत अहिरे श्री. आनंद काळे श्री. आकाश ठोंबरे, श्री गजानन घोडके यांनी विशेष परिश्रम घेतलेत.

## मा. भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते सम्राट अशोक सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या माता रमाई भीमराव आंबेडकर उद्यानाचे उद्घाटन








सम्राट अशोक सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या जागेवरील माता रमाई भिमराव आंबेडकर या उद्यानाचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय भीमराव आंबेडकर साहेब यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी, ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत डॉक्टर ऋषिकेश कांबळे, सामाजिक कार्यकर्ता गुड्डू भाऊ निकाळजे, प्राध्यापक मनोहर लोंढे, समता सैनिक दल, सोसायटीचे अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर युवराज धबडगे, सचिव संघपाल गायकवाड , चंद्रकांत साबळे, महेंद्र पठाडे, जितेंद्र बागुल, प्राध्यापक राहुल खंदारे, अजय डोंगरे,राजेंद्र साबळे,धम्मपाल गायकवाड,तसेच सोसायटीतील सर्व बौद्ध उपासक उपाशीका यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १८ जानेवारी २०२५


## नामविस्तार दिनानिमित्त महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षातर्फे अभिवादन...



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ३१ व्या नामविस्तार दिनानिमित्त महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षातर्फे अभिवादन करण्यात आले यावेळेस सुभेदारी विश्रामगृह ते विद्यापीठ गेट अशी चारचाकी वाहन रॅली काढण्यात आली तेव्हा शेकडो चार चाकी वाहनांचा रॅलीमध्ये समावेश होता तसेच रॅली द्वारे कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी विद्यापीठ गेट समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून व मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर लढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणारे नामांतर शाहिद यांच्या स्मारकाला पुष्प चक्र अर्पण करून महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजयभैय्या सोनवणे यांच्या हस्ते अभिवादन केले. या रॅलीचे प्रमुख आकर्षण म्हणजे पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजयभैय्या सोनवणे होते व त्यांची या रॅलीला प्रमुख उपस्थिती होती. रॅलीचे नियोजन जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे यांनी केले होते, रॅलीमध्ये पक्षाचे छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) जिल्ह्यातील प्रत्येक तालुका व गावातून आलेल्या असंख्य कार्यकर्त्यांनी आपला सहभाग नोंदवला. रॅलीच्या पूर्वी सुभेदारी विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये पक्षाचे अध्यक्ष संजयभैय्या सोनवणे यांनी पत्रकारांशी वार्तालाप करताना सांगितले की नामविस्तार झाला म्हणजे सर्व काही संपले असे नाही, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाप्रमाणे विद्यापीठाचा कारभार चालला पाहिजे, विद्यार्थ्यांना सर्व सुख सुविधा मिळायला पाहिजेत व शिक्षणाचा दर्जा उंचावला गेला पाहिजे. मागील तीन वर्षापासून चालू असलेले नामांतर शहीद स्मारकाचे काम दर्जेदार व उच्च प्रतीचे झाले पाहिजे यासाठी आमचे जिल्हाप्रमुख आयु. राहुल वडमारे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही लवकरच विद्यापीठ प्रशासनाची भेट घेणार असून त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून या बाबी आम्ही त्यांच्या निदर्शनास आणून देणार आहोत आम्ही सत्ताधारी पक्षाबरोबर असल्याकारणाने काही अडचणी आल्यास आम्ही स्वतः उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याशी याबाबत चर्चा करणार असून येत्या नामविस्तार दिनापर्यंत शहीद स्मारकाचे काम पूर्ण झालेले आपणास दिसेल असेही त्यांनी सांगितले व विद्यापीठ परिसरात काम करत असलेल्या विद्यार्थी नेते, सामाजिक कार्यकर्ते विद्यार्थी यांच्यावर कूलगुरू व विद्यापीठ प्रशासना मार्फत जे गंभीर स्वरूपाचे गून्हे दाखल करण्यात आले आहे ते तात्काळ रद्द करण्यात आले पाहिजे असे सांगितले, याचबरोबर येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये ही आपण महायुती बरोबर काही जागा लढवणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळेस मराठवाड्यातील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र ही त्यांच्या हस्ते देण्यात आले या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे, जिल्हा संघटक रतन जाधव, जिल्हा सचिव बापूसाहेब चाबुकस्वार, शहर उपाध्यक्ष संजय चव्हाण, युवा नेते तुषार भोसले, हिरालाल जयस्वाल, महादेव जानकर, बंडू तांदळे , महेंद्रजी जाधव, विकास भाऊ गायकवाड,संजय साबळे, राजेंद्र जाधव, पंकज भुतकर, राजेंद्र सोनवणे, शरद खरात, राहुल जाधव, विजय चाबुकस्वार, बाबासाहेब ससाने, महिला आघाडीच्या अलकाताई जाधव, स्वातीताई घुसळे, द्वारकाबाई कीर्तीशाई , केसरबाई दिवेकर ,यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते..


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103


## जिल्हाधिकारी कार्यालयात सदविचारांचे वाणसणांद्वारे संवाद आणि संस्कार वृद्धिंगत व्हावा - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी




**छत्रपती संभाजीनगर,** दि.१७ (जिमाका)- भारतीय संस्कृतीमध्ये विविध सण उत्सवांचे विशेष महत्व आहे, मकरसंक्रांतीचेही भौगोलिक आणि अध्यात्मिक महत्त्व आहे. या सणानिमित्त हळदीकुंकू कार्यक्रमानिमित्त महिलांच्या एकत्र येण्यातून विचारांचे आदान प्रदान होते. त्यातून प्रेम-आपुलकीचे नाते वृद्धिंगत होते. संवाद हरवलेल्या या काळात या माध्यमातून संवाद व संस्कार वृद्धिंगत व्हावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहामध्ये महिलांसाठी हळदीकुंकवांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी उपस्थित होते.अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर,उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, डॉ.सुचिता शिंदे, जिल्हा महिला बालविकास अधिकारी रेशमा चिंमद्रे, जिल्हा परिषदच्या जिल्हा महिला बालविकास प्रकल्प अधिकारी सुवर्णा जाधव यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील महिला अधिकारी व कर्मचारी या हळदीकुंकवाच्या कार्यक्रमास उपस्थित होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून विधीज्ञ ॲड.रेणुका घुले, डॉ.सविता मुळे व सायबर सेलचे धनंजय सानप उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की जिल्ह्यामध्ये मुलीचा जन्मदर वाढवणे, महिला सुरक्षितता त्याचप्रमाणे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा प्रशासन करत आहे. महिलांच्या विकासासाठी शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळावा यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे. सुसंस्कारित पिढी निर्माण करण्यासाठी पालकांबरोबरच शासनातील विविध विभागातील काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी महिलांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी सांगितले.

मार्गदर्शक डॉ.सविता मुळे यांनी सांगितले की,भारतीय संस्कृतीचे अद्वितीय महत्त्व आपल्या जीवनात आहे. माणसाने मीपणा किंवा अहंभाव सोडून वागलं पाहिजे, यामुळे समाजातील विविध समस्या निर्माण होणार नाहीत. कीर्तनाच्या माध्यमातून विविध संतांच्या ओव्याचा दाखला देत त्यांनी ही सुखी आणि समाधानी कुटुंब आणि सुखी जीवन करण्यासाठी अहंकार विरहित जीवनपद्धती अंगीकरण्या संदर्भात मार्गदर्शन केले.

सायबर सेलचे धनंजय सानप यांनी सांगितले की, महिलांनी कोणत्याही समाज माध्यमाचा वापर काळजीपूर्वक करावा,यामध्ये फोटो स्टेटस, विविध एपीके फाइल्स यासंदर्भातला कोणत्याही लिंक किंवा संकेतस्थळाला भेट देत असताना खातरजमा करावी. त्याचप्रमाणे फेसबुक आणि इंस्टाग्राम सारख्या माध्यमातून येणाऱ्या फ्रेंड रिक्वेस्ट ह्या तपासूनच स्वीकार करावा. फसव्या फोन कॉल्स ला उत्तर न देता, आपली खाजगी, वैयक्तिक माहिती कोणत्याही समाज माध्यमावर प्रदर्शित करू नये जेणेकरून आपल्या खाजगी आणि सामजिक जीवनावर याचा परिणाम होऊ शकतो. समाज माध्यमांचा वापर करत असताना काळजीपूर्वक वापर आणि नियंत्रित वापर असावा असे यावेळी यांनी सांगितले.

ॲड. रेणुका घुले यांनी सांगितले की. महिलांसाठी विविध कायदे असून या कायद्याद्वारे महिलांना सुरक्षिता आणि संरक्षण त्याचप्रमाणे निर्भय वातावरणात जगण्याचा हक्क प्राप्त होतो. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याचे अंमलबजावणी होत असताना कोणालाही त्रास होईल अशा हेतूने तक्रार महिलेने करू नये. तसेच अन्याय सहन ही करू नये, या कायद्याचा सुयोग्य वापर करून महिलांना सुरक्षित वातावरण,कुटुंबात आणि समाजात मिळावे यासाठी याचा वापर व्हावा.

सुत्रसंचालन रोहीणी माळी यांनी तर आभार प्रदर्शन संगिता राठोड यांनी केले.